# महाराष्ट्र शासन
# मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह मालेगाव जि नाशिक

## 1. मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह मालेगाव जि नाशिक या वसतीगृहाची स्थापना

शासन निर्णय दिनांक 03/10/1973 व दिनांक 20/04/1979 व शासन परिपत्रक दि- 12/09/1973 शासन निर्णय,शिक्षण व सेवायोजन विभाग क्रंमाक-इबीसी -1081/(1315)/साशि-5 दिनांक - 30 सप्टेंबर 1985 अन्वये आर्थिक दृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह स्थापन करण्याच्या योजने अंतर्गत शासकीय आर्थिक दृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह मालेगाव हे वसतीगृह स्थापन केलेले आहे. सदरचे वसतीगृह मालेगाव जि-नाशिक या ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध नसल्यामुळे श्रीमती. दक्षा गोलेच्छा यांच्या मालकीच्या इमारती मध्ये सुरु केलेले आहे. शासनाने या वसतीगृहासाठी प्रवेश क्षमता 100 विद्यार्थी ठरवून दिलेली आहे.

## 2.विद्यार्थी प्रवेश-

मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, मालेगाव नाशिक या वसतीगृहात प्रवेश क्षमता 100 विद्यार्थीची आहे. परंतु वसतीगृह इमारतीच्या क्षमतेनुसार 80 विद्यार्थ्यांना नियमानुसार प्रवेश दिला जातो. प्रत्येक वर्षी आर्थिक दृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्याची निवड शासनाकडून नियुक्त केलेल्या निवड समिती द्वारे खालील प्रमाणे विभागावार करण्यात येते.

| अ.क्रं | विभाग | प्रवेश क्षमतेनुसार विद्यार्थी संख्या | वसतीगृह इमारतीच्या क्षमतेनुसार प्रवेश देण्यात येणा-या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | माध्यमिक विभाग | 30 | 25 |
| 2 | उच्च माध्यमिक विभाग | 30 | 25 |
| 3 | महाविद्यालयीन विभाग | 30 | 25 |
| 4 | तंत्र शिक्षण विभाग | 10 | 05 |
| **एकूण विद्यार्थी** | | **100** | **80** |

## 3. वसतीगृहातील सेवा व सुविधा -

मातोश्री शासकीय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना राहण्यासाठी खोली, 2-वेळेचे भोजन, फिल्टरचे पिण्याचे पाणी व आंघोळीचे पाणी इत्यादी अनुषंगिक सेवा व सुविधा दिल्या जातात.

सद्यस्थितीत वसतीगृहामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना राहण्यासाठी 8 मोठया (बाथरुम,संडाससह) खोल्या असून सुविधेच्या अनुषंगाने प्रत्येक विद्यार्थ्यांना 1-पलंग,1-गादी, 1-बेडशिट, 1-चादर, 1-उशी

इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. तसेच प्रत्येक खोली मध्ये मोठा आरशा, 3 फॅन, चप्पल स्टॅन्ड, कपडयासाठी हँगरसह सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

## 4.वसतीगृह इमारत:-

मातोश्री शासकिय आर्थिकदृष्टया मागसवर्गीय मुलांचे वसतीगृह हे श्रीमती. दक्षा मगराज गोलच्छा यांच्या खाजगी मालकीचे इमारतीमध्ये भाडेतत्वावर कार्यरत असून सदर इमारती मध्ये कार्यालयासाठी-1 खोली, स्वयंपाकगृहासाठी -1खोली, अभ्यागतासाठी-1खोली, अभ्यासिकासाठी -1 खोली, भोजनासाठी 1-खोली, सार्वजनिक प्रसाधन गृहासाठी-1 खोली व विद्यार्थी निवासासाठी 08 खोल्या (277.74 Sq Mt) अशा एकूण 14 खोल्या उपलब्ध आहेत. सदर इमारतीचे दरमहा भाडे रु.47, 257/- इतके सार्वजनिक बांधकाम विभाग,मालेगाव जि नाशिक.यांनी मंजूर केलेले आहे.

## 5.वसतीगृहातील मंजूर पदे,भरलेली पदे व रिक्त पदाचा तपशिल:-

शासन निर्णय,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,क्रं.डीएचई-1008/(09/08)/मशि-6 दि-3/12/2008 अन्वये प्रस्तुत वसतीगृहासाठी निर्माण झालेल्या 6-पदांचा व 4 कंत्राटी पदांचा तपशिल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| क्रं | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे | कर्तव्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | कार्यालय प्रमुख/गृहप्रमख/ अधिक्षक-क | 1 | 1 | 0 | आहरण व संवितरण अधिकारी व कार्यालय प्रमुख म्हणून काम पहाणे,आस्थापना विषयक संपूर्ण कामकाज पहाणे, वसतीगृहात विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया राबवणे, आहार विषयी ,लेखा विषयी बाबी,सुरक्षा विषयी बाबीचे,जडवस्तू संग्रह नोंदीचे या सर्व बाबीचे कामकाज पहाणे व नियंत्रण करणे व योग्य तो निर्णय घेणे. |
| 2 | वरिष्ठ लिपिक | 1 | 0 | 1 | लेखा विषयी संपूर्ण कामकाज,कोषागारात देयके सादर करणे,बँक विषयी कामकाज, कॅशबुक नोंदी,अंदाजपत्रक तयार करुन संचालनालयास पाठविणे, जमा- खर्चाचा ताळमेळ घेणे, जडवस्तू संग्रह नोंदी करणे |
| 3 | कनिष्ठ लिपिक | 1 | 1 | 0 | आवक-जावक नोंदी करणे,विद्यार्थ्यांची दैनंदिनी उपस्थिती घेणे,विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करणे व वर्ष अखेरीस साहित्य जमा करुन घेणे,वर्ग-4 कर्मचारी यांचे भनिनि/डीसीपीएस विषयक लेखे अद्ययावत करणे,स्वयंपाका बाबतीत लक्ष ठेवणे व भोजनाचा दर्जा उत्तम ठेवणे बाबत कार्यवाही करणे |
| 4 | शिपाई | 1 | 0 | 1 | कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी सांगितलेली सर्व कामे करणे,उपकोषागारात संदेश वाहक म्हणून काम करणे,बँकेशी आर्थिक व्यवहाराची कामे करणे, टपालाचे कामे करणे, इत्यादी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | स्वयंपाकी | 1 | 0 | 1 | वसतीगृहात मुलांच्या उपस्थिती संख्येनुसार आहार प्रमाणानुसार काढणे, तो बनवणे,मुलांना वाटप करणे,स्वंयपाक गृह स्वच्छ ठेवणे |
| 6 | मदतनीस | 1 | 0 | 1 | स्वयंपाकी यांना दैनदिन कामकाजात संपूर्ण मदत करणे |
| | **कंत्राटी पध्दतीवरील भरलेली कर्मचारी** | | | | |
| 7 | पहारेकरी | 3 | 3 | 0 | वसतीगृह इमारत व परिसरात कडक पहारा करणे, विद्यार्थीवर देखरेख करणे व लक्ष ठेवणे,बाहेरील व्यक्तींना वसतगृहात येणास मनाई करणे,पाणी पुरवठा विषयी कामे करणे, विद्यार्थ्यांचे समस्या जाणून घेऊन आपआपसातील वाद मिटवणे |
| 8 | सफाईगार | 1 | 1 | 0 | वसतीगृहातील स्वच्छतागृहे साफसफाई ठेवणे, वसतीगृहाच्या खोल्या, अभ्यासिकेची खोली इत्यादी साफसफाई करणे व वसतीगृहाचा परिसर स्वच्छ ठेवणे. |

## 6.वसतीगृह- सुरक्षा

मातोश्री शासकिय आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह,मालेगाव जि नाशिक या वसतीगृहाच्या पाठीमागील बाजूस पुर्व - पश्चिम व उत्तर-दक्षिण बाजूस 5 फूट उंचीची भिंत कम्पाऊंड केलेले आहे व समोरील पूर्व-पश्चिम बाजूस 3 फूट उंचीची सुरक्षा भिंतीचे कम्पाऊंड केलेले आहे. इमारतीच्या मुख्य प्रवेशाद्वारा साठी लोखंडी चायनल गेट बसविलेले आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने कंत्राटी पदावर 3 सुरक्षारक्षक कार्यरत आहेत. तसेच 12 कॅमेरेसह सीसीटीव्ही कॅमेरे कार्यन्वीत आहेत. त्यामुळे वसतीगृहाची सुरक्षा पुर्ण कार्यक्षमतेने कार्यरत आहे.